| MHBH090007312024 | | | | |
|---|---|---|---|---|
| | दाखल दि. | ०३.०६.२०२४ | | |
| | नोंदणी दि. | ०३.०६.२०२४ | | |
| | निकाल दि. | ०७.०७.२०२६ | | |
| | कालावधी | ०२ वर्ष | ०१ म. | ०४ दि |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग तुमसर, जि. भंडारा यांचे न्यायालयात.**

(पिठासीन अधिकारी आर. पी. बाठे)

**संक्षिप्त फौ.ख. क्र. ४६८/२०२४** **निशाणी क्र. ११ खाली**

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलिस ठाणे अधिकारी,<br>पोलिस ठाणे, गोबरवाही,<br>ता. तुमसर, जि. भंडारा. |
| अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ | श्री. पी. आर. भलावी, सहा. सरकारी अभियोक्ता. |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| आरोपी | **गौरव भिमराव नांदगाये**<br>वयः ४३ वर्षे, धंदाः मजुरी,<br>राह. नाकाडोंगरी, ता. तुमसर, जि. भंडारा. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री. डी. एम. गहाणे |

**न्यायनिर्णय**

(दिनांक ०७.०७.२०२६ रोजी घोषित)

प्रस्तुत खटला आरोपी विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५–फ अन्वये गुन्हा केल्याचा आरोपावरून चालविण्यात आला.

२. अभियोगपक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. भलावी व आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. गहाणे यांचा युक्तीवाद ऐकला. पुढील मुद्दे माझ्यासमोर निष्कर्षासाठी उपस्थित होत असुन त्यांचे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | दिनांक २५.०४.२०२४ रोजी १०.०० ते ११.०० वाजताचे दरम्यान मौजे पाथरी हमेशा, ता. तुमसर जि. भंडारा येथील तलावाच्या काठाजवळ आरोपी हा त्याचे ताब्यात अवैद्यरित्या दारू गाळण्याचे उद्येशाने एकुण ३३० किलो मोहासडवा बाळगुन मिळुन आला व त्याव्दारे त्याने महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५–फ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | .. | **नाही.** |
| २. | आदेश काय ? | .. | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ व २ करीता</u> :**

**३.** अभियोगपक्षाने आरोपीवर महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५–फ प्रमाणे दोषारोप ठेवलेला आहे. सदरचा दोषारोप वाजगी संशयापलीकडे जावुन सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षाची आहे.

**४.** प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने दोन पंच साक्षीदाराची साक्ष नोंदविलेली आहे. पंच साक्षदार विकास (स.सा.क्र. १) व शोभाराम (स.सा.क्र. २) यांचा पुरावा पाहता त्यांनी सरतपासातच कथन केले की, त्यांना पोलिसांना पंचनाम्याच्या कार्यवाहीसाठी कोणतेही सुचनापत्र दिले नव्हते तसेच त्यांचेसमक्ष कोणतीही घटनास्थळ पंचनाम्याची व जप्तीची कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्याच्या केवळ सह्या घेण्यात आलेल्या आहेत.

**५.** सदर दोन्ही पंच साक्षदाराचा पुरावा पाहता त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा दिलेला नाही. अभिलेखावरील साक्षीदारांचा पुरावा पाहता आरोपी हा त्याचे ताब्यात ३३० किलो मोहासडवा दारू गाळण्याचे उद्येशाने बाळगुन मिळुन आला या कथनाबाबत साशंकता निमार्ण होते. परीणामत: अभियोग पक्षास प्रस्तुत प्रकरणात जप्तीच सिध्द करता आलेली नाही.

**६.** अभिलेखावर जरी रासायनिक परिक्षण अहवाल दाखल करण्यात आला व

त्यामध्ये परिक्षणासाठी पाठविण्यात आलेल्या नमुण्यात ४.१८ टक्के मद्यार्काचे प्रमाण दिसुन येत असले तरी सदर पाठविण्यात आलेला नमुना हा आरोपीच्या तथाकथीत ताब्यातुन पकडण्यात आलेल्या मुद्येमालातुन नमुना वेगळर काढण्यात आला होता याबाबत पंच साक्षीदार दुजोरा देत नाही. त्यामुळे सदर रासायनिक परिक्षण अहवालाचा फायदा अभियोग पक्षास मिळणार नाही. परीणामत: महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५–फ प्रमाणे अपराध सिध्दीसाठी आवश्यक असलेले घटक अभियोग पक्ष वाजवी संशयापलीकडे जावुन सिध्द करीत नाही. या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे म्हणुन मी मुद्या क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्या क्र. २ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी गौरव भिमराव नांदगाये यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम २३२(१) अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५–फ अन्वयेच्या दंडनीय अपराधातुन संशयाचा फायदा देवुन मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्य करण्यात येत आहे.

३. आरोपीने पुढील सहा महिन्याकरीता भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ अन्वये रक्कम रूपये १५,०००/– चा वैयक्तिक जातमुचलका दाखल करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

RAVINDRA PRALHAD BATHE
Digitally signed by RAVINDRA PRALHAD BATHE
Date: 2026.07.07 17:09:36 +0530

[आर. पी. बाठे]

दि. ०७.०७.२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तुमसर.